**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ५३ दिनांक २०/०७/२०२३**

# विविध पोलीस ठाणे हद्दीत दाखल गुन्ह्यातील सराईत आरोपीस वाडा पोलीस ठाणे यांचेकडून अटक

दिनांक १२/०७/२०२३ रोजी सायंकाळी ०५:४५ वाजेच्या सुमारास फिर्यादी श्री. मोतीराम बाळु वारे, रा.ओगदे, पो.परळी, ता.वाडा, जि.पालघर हे रस्त्याने पायी घरी चालत जात असताना विना नंबर प्लेटच्या मोटार सायकलवरुन २ अनोळखी इसम येऊन तक्रारदास यास त्यांनी वाडा किती किलोमीटर अंतर आहे अशी विचारणा करुन सदरची माहिती फिर्यादी देत असताना त्यांनी फिर्यादीच्या छातीवर हाताने मारुन कॉलर पकडून व दुसऱ्या इसमाने धारदार सुरा काढुन गळयावर ठेवुन शिवीगाळ करुन धमकावून पैशाची मागणी केली. फिर्यादीने त्यास नकार दिला असता सुऱ्याचा धाक दाखवुन तक्रारदाराच्या खिशातील २ मोबाईल, आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसंन्स, मेमरीकार्ड, युनियन बॅकेचे एटीएम कार्ड, श्रमकार्ड, पैशाचे पाकीट इत्यादी वस्तु काढून नेलेबाबत वाडा पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.२७२/२०२३ भा.दं.वि.क. ३९८, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी पोनि/सुरेश कदम, प्रभारी अधिकारी, वाडा पोलीस ठाणे यांना कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार पोनि/सुरेश कदम, प्रभारी अधिकारी, वाडा पोलीस ठाणे यांनी पोलीस पथक तयार केले. नमूद पथकाने गोपणीय बातमीद्वारे तसेच सीसीटिव्ही फुटेज व इतर तांत्रीक गोष्टींचा अभ्यास करुन वरील गुन्ह्यातील आरोपी इसम १) सोहेल शब्बीर दिवकर, वय ४० वर्ष, रा.राहुर, पो.पडघा, ता.भिवंडी, जि.ठाणे, २)राजेश बाळाराम वाघे, वय २१ वर्ष, रा.अंर्जुर्ली, पो. पडघा, ता. भिवंडी यांना पडघा येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आले. नमूद आरोपींची कसून चौकशी केली असता अटके दरम्यान आरोपीत यांनी दिनांक १६/०७/२०२३ रोजी वाडा पोलीस ठाणे हद्दीतुन व दिनांक १०/०७/२०२३ रोजी खडकपाडा पोलीस ठाणे, कल्याण हदीतून मोटार सायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाले. याबाबत वाडा पो.स्टे. गु.रजि.नं.२७८/२०२३ भा.दं.वि.क.३७९ प्रमाणे व खडकपाडा पोलीस ठाणे गु.रजि.नं.३१३/२०२३ भा.दं.वि.सं.क.३७९ प्रमाणे दोन गुन्हे दाखल करण्यात आले होते.

सदर गुन्हयातील आरोपी सोहेल शब्बीर दिवकर, हा दिनांक ०६/०७/२०२३ रोजी न्यायालयातून जामीनावर सुटलेला असुन जामीन झालेनंतर १० दिवसांत त्याच्यावर वरील ३ गुन्हे दाखल झालेले असून यापुर्वी त्याच्यावर खालीलप्रमाणे एकूण ३० गुन्हे दाखल आहेत.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्रमांक | कलम |
|---|---|---|---|
| १ | शहापुर पोलीस ठाणे | ३२३/२०२१ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | ११/२०१६ | भादविसं कलम ३०७,३५३,५४ प्रमाणे. |
| | | ०१/२०१६ | भादविसं कलम ३०७,३५३,५४ प्रमाणे. |
| | | २११/२०२१ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १३७/२०२१ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| २ | भिवंडी पोलीस ठाणे | १३६१/२०१८ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | ११७८/२०१८ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | ११९२/२०१६ | भादविसं कलम ३७९, ३४ प्रमाणे. |
| | | १२४६/२०१९ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १६७२/२०२० | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १४६०/२०१९ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १३२३/२०१८ | भादविसं कलम ३७९,४११ प्रमाणे. |
| ३ | शांतीनगर पोलीस ठाणे | १३२४/२०१८ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १३३/२०१७ | भादविसं कलम ३७९, ३४ प्रमाणे. |
| ४ | पडघा पोलीस ठाणे | १०/२००७ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १७/२०२३ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| ५ | निजामपुर पोलीस ठाणे | ८८/२०२१ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १२८/२०२१ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| ६ | गणेशपुरी पोलीस ठाणे | ९६१/२०१६ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| ७ | भद्रकाली पोलीस ठाणे, नाशिक | ५४/२००५ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| ८ | जव्हार पोलीस ठाणे | ५७/२००४ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | ६८/२००४ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | ०३/२००५ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | ३४/२००४ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| ९ | वाडा पोलीस ठाणे | १२९/२०१९ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | २१०/२०१८ | भादविसं कलम ३८०,४५७ प्रमाणे. |
| | | २५७/२०१८ | भादविसं कलम ३८०,४५७ प्रमाणे. |
| | | २५०/२०१८ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| १० | कासा पोलीस ठाणे | १५९/२०२१ | भादविसं कलम ३७९ प्रमाणे. |
| | | १६२/२०२० | भादविसं कलम ३७९,५११ प्रमाणे. |

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. शैलेश काळे, उप विभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, श्री. सुरेश कदम, पोलीस निरीक्षक, वाडा पोलीस ठाणे, पोउपनि/चंद्रकांत हाके, पोउपनि/मयुरेश अंबाजी, पोहवा/विजय मढवी, पोहवा/नामदेव गवळी, पोशि/गजानन जाधव, पोशि/सचिन भोये सर्व नेमणूक वाडा पोलीस ठाणे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.